राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ पुणे यांच्यासमोरील
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नविन प्रशासकीय इमारत,
विधान भवन समोर,पुणे-४११००१

श्री. सलीम कादर शेख
वॉर्ड नं ४,श्रीरामपूर,
जि. अहमदनगर, ४१३७०९

सुनावणी दिनांक-१९/०३/२०२५

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये विविध प्राधिकरण निहाय खालीलप्रमाणे एकूण ६९ द्वितीय अपिले (लगतच्या यादीनुसार) दाखल केलेली आहेत.

| अ.क्र. | प्राधिकरणाचे नाव | द्वि. अपील संख्या |
|---|---|---|
| १ | सहाय्यक वनसंरक्षक-२ सामाजिक वनीकरण विभाग पुणे | ३९ |
| २ | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर | |
| ३ | सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण. कॅम्पा व संवव्य) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर | |
| ४ | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड पुणे. | |
| ५ | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर | |
| ६ | सहाय्यक वनसंरक्षक (सांख्यिकी) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, पुणे | |
| ७ | सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) उपवनसंरक्षक, अहमदनगर स्थित,पुणे वन विभाग, पुणे | |
| ८ | सहाय्यक वनसंरक्षक-२ (सामाजिक वनीकरण विभाग) साळुंखे विहार, पुणे | |
| ९ | उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सातारा | १० |
| १० | गटविकास अधिकारी, पंचायत समिती, खटाव-जावळी-माण-पाटण-खंडाळा-फलटण-सातारा-वाई-कोरेगाव | १७ |
| ११ | कार्यकारी अभियंता, कुकडी प्रकल्प, नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे | २ |
| १२ | कार्यकारी अभियंता, खडकवासला पाटबंधारे, जि.पुणे | १ |

प्रस्तुतची व्दितीय अपीले दाखल करतांना प्रयोजनामध्ये, अपिल आदेश होऊनही माहिती दिली नाही, माहिती दडवून ठेवली, इ. प्रयोजने नमूद केलेली आहेत. सदर व्दितीय अपीलांची सुनावणी

दि.१९/०३/२०२५ रोजी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी संबंधित सर्व प्राधिकरणांचे जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी हजर आहेत. अपिलार्थी आयोगास कोणतीही पूर्वसुचना न देता गैरहजर आहेत.

१. आज रोजी सुनावणी दरम्यान विविध प्राधिकरणांच्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगास कथन केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अत्यंत व्यापक, विस्तृत स्वरुपाची आहे. तरीही अपिलार्थीच्या प्रत्येक अर्जावर कार्यवाही करुन त्यांना उपलब्ध माहिती/उत्तर पुरविली आहे. काही प्रकरणात माहिती शुल्क कळविले आहे परंतु त्यांनी शुल्क भरले नाही त्यामुळे माहिती पुरविले नाही.

२. सुनावणी दरम्यान विविध प्राधिकरणांच्या प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास अवगत केले की, अपिलार्थीच्या प्रत्येक अपिल अर्जावर सुनावणी घेऊन आदेश पारीत केले आहेत. अपिलार्थी प्रथम अपिल सुनावणीस कधीही हजर राहत नाही.

३. सुनावणी दरम्यान उपस्थित सर्व जन माहिती अधिकारी यांना, अपिलार्थी यांच्या मोठ्या प्रमाणावर वारंवार माहिती अर्ज करण्याच्या कारणाबद्दल तसेच अपिलार्थी यांच्या प्रथम अपील व व्दितीय सादर करण्याच्या प्रयोजनामधील कारणांबाबत विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की, अपिलार्थी सतत माहिती अर्ज करुन, प्रशासनास त्रास देत असतात, त्यांना उपलब्ध सर्व माहिती पुरविली आहे, त्यांच्या माहिती अर्जावर मुदतीत कार्यवाही केली आहे. बहुतांश प्रकरणात शुल्क कळवूनही त्यांनी शुल्क भरले नाही.

४. अपिलार्थी यांच्या अशा असहकार्याच्या भुमिकेचा दैनंदिन शासकीय कामकाजावर विपरित परिणाम होतो. कारण अपिलार्थीच्या माहिती अर्जातील विस्तृत माहिती प्रथमतः एकत्रित /संकलित करुन ती अवलोकनास्तव देणे अपेक्षित आहे. अपिलार्थी हे माहिती अधिकारातंर्गत अभिप्रेत असलेली सकारात्मक भूमिका पार पाडण्याऐवजी नेहमी असहकार्याची भूमिका घेतात, तसेच प्रत्येक प्रकरणात वाटाघाटी / तडजोड (सेटलमेंट) कशी होईल यासाठी ते प्रयत्नशील असतात, असा गंभीर आरोप उपस्थित अधिकाऱ्यांनी केलेला आहे. तसेच अपिलार्थी हे माहिती मिळविण्यासाठी नव्हे तर स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा अनिर्बंधपणे सर्रास दुरुपयोग करत असल्याचा गंभीर आरोपही उपस्थित अधिकाऱ्यांनी आयोगासमोर आपली बाजू मांडताना केला.

५. सुनावणीचे वेळी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी असे अवगत केले की, अपिलार्थी यांना त्यांच्या प्रथम अपिलाच्या अनुषंगाने त्यांची बाजु मांडण्याची संधी दिली असता ते कधीही सुनावणीस उपस्थित राहत नाहीत. तरीदेखील उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे उचित आदेश पारीत केले आहेत.

६. अपिलार्थी मोठ्या संख्येने द्वितीय अपिल आयोगाकडे दाखल करत असतात, त्यांना माहिती मिळविण्यामध्ये कुठलेही स्वारस्य नसते. प्रत्येक प्रकरणात वाटाघाटी / तडजोड (सेटलमेंट) कशी होईल अशी भुमिका ते नेहमी घेतात. माहिती अधिकाराचा सर्रास दुरुपयोग करुन सदर कायद्याचा शस्त्र (Tool) म्हणून वापर करत आहेत. त्या आधारे विविध शासकीय प्राधिकरणामध्ये दहशत निर्माण करणे हा त्यांचा हेतु असून स्वतचे स्तोम: माजविण्याच्या हेतुने या कायद्याचा अनिर्बंध वापर करत आहेत. त्यामुळे प्राधिकरणाच्या दैनंदिन कामकाजावर अनिष्ठ परिणाम झाला असल्याचे उपस्थित जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास समक्ष सांगितले.

उपरोक्त पार्श्वभूमि विचारात घेता, प्रस्तुत प्रकरणी निर्णयाप्रत येताना, आयोगाने, मा. सर्वोच्च न्यायालय, केंद्रीय माहिती आयोग, यांनी विविध प्रकरणात दिलेले न्यायनिवाडे, अधिनियमाची प्रस्तावना,

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र

इत्यादि खालील नमूद बाबी विचारात घेतल्या आहेत.

१) माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून अपिलार्थी यांनी वेगवेगळ्या सार्वजनिक प्राधिकरणाकडे सादर केलेले माहिती अर्ज, प्रथम अपीले व राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेली द्वितीय अपीले यासाठी हेतुतः अवलंबलेली कार्यपद्धती याची पडताळणी अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमुद तत्वांशी करण्यात आली. या अधिनियमाच्या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

" ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता याबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधन संपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबीनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्पर विरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षीत माहिती पुरविण्या करिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

(२) मा सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील.६४५४/२०११ दिनांक ०९.०८.२०११ रोजी Applicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors.Respondents या प्रकरणी खालील प्रमाणे आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to do their duty-Nation does not want a scenario where ७५ % of the staff of public authorities spend ७५% of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharge ing their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

३. मा उच्च न्यायालय आंधप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.२०१८२, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being any useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility to those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

.(४) केंद्रीय माहिती आयोगाने CIC/LS/२०१२/०००८५८-SA ते ०००८७२-SA संदर्भात दिनांक ०४.०७.२०१४ रोजी पारित केलेल्या आदेशात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

Earlier Obervation of CIC : Shri. M.M.Ansari

"In several occasions earlier the Central Information Commission referred to the issue of repeated RTI requests and harassing tendency. In Prem Prakash Kumar V NFL, Panipat,(Decision No.२४६/IC(A)२००६, FNo.CIC/MA/A/२००६/००३७४ & ३७५ dated २८ August २००६) the applicant sought documents and specific comments of CPIO on ८९ queries. The learned Commissioner Shri M.M.Ansari observed that in fact, the nature of queries and information sought are such that the information seeker would never be satisfied because the promotion of self-interest, rather than public interest was dominant as the appellant had sought redressed of grievances."

५. मा. शैलेश गांधी यांनी असे नमूद केले आहे की, अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा कायदेशीर हत्यार म्हणून करत आहेत, जो अत्यंत त्रासदायक स्वरुपाचा आहे. याबाबत खालीलप्रमाणे निरीक्षण नमूद केले आहे

It is relevant here to quote a paragraph from the order of Learned Information Commissioner Shri Shailesh Gandhi in case numbers No.CIC/SG/C/ २०११/०००७६०, CIC/SM/२०११/ ०००९२६/ SG, CIC/SM/A/२०११/००११११/SG, CIC/ SM/A/२०११/ ००२९०९ dated १७ th January, २०१२) in a second appeal "The commission, at several appellate hearing, has explained to the complainant that under RTI Act, only the information as per records can be made available, multiple RTI applications and appeals would not provide him any information beyond the records that exists. The Commission recognizes the fact that valuable time of complainant, respondent public authority as well as the Commission is being spent in merely going through the motion prescribed under the RTI Act again and again to obtain similar information..... At this juncture the Commission would like to mention that the right to information is a fundamental right of the citizens, It cannot be used indiscriminately to fulfill the demand of one individual. In the present matter. It must be noted that the complainant is pursuing multiple litigation and various public authorities are being asked to divert and extraordinarily disproportionate amount of resources just to respond to hundreds of RTI applications filled by him....The Commission is also conscious of the fact that it is financed by the poorest man in this country who may be starving to death. The

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

Complainant by repeatedly filling similar RTI application and appeals with the respondent public authority and the commission is wasting public resources."

तसेच असेही नमूद केले आहे की, वारंवार माहिती अर्ज करणारे अर्जदार हे माहितीची मागणी / प्रकटीकरण हे त्यांचा अंतस्थ व्यक्तिगत हेतु साध्य करण्यासाठी करतात, त्यामध्ये व्यक्तिगत हिताचा विचार असल्याने सार्वजनिक हित साध्य होणार नसते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये नमूद वैधानिक उद्देश स्पष्टपणे साध्य होत नाही.

तसेच मा. उच्च न्यायालय, कर्नाटक, धारवाड खंडपीठ येथील रिट पिटीशन नं १०१२६० /२०२४ (GM-RES) मध्ये दि २५.०९.२०२४ रोजी दिलेल्या आदेशात वारंवार मोठ्या प्रमाणावर माहिती अर्ज दाखल करणाऱ्या अर्जदाराचे अपील फेटाळलेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी उपरोक्त न्यायनिवाडे तपशीलवाररित्या विचारात घेता आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. माहिती अधिकार अधिनियम २००५ मध्ये नमूद तरतूदीनुसार अपिलार्थीस माहिती मागण्याबाबत कुठल्याही प्रकारचा प्रतिबंध नसला तरी, शासकीय कामात पारदर्शकता आणून जनतेला माहिती मिळावी आणि शासकीय कामात कार्य तत्परता असावी असा या कायद्याचा मुख्य हेतु आहे. तथापि अपिलार्थी यांनी विपरीत भूमिका घेऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग करण्यासाठी सुनियोजित पद्धतीने जाणीवपूर्वक व्यापक व अतिविस्तृत स्वरूपाच्या माहितीची मागणी करण्यासाठी मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले व त्यानुषंगाने मोठ्या संख्येने आयोगाकडे द्वितीय अपीले सादर केली आहेत.

२. अपिलार्थी यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपिलांची तपासणी केली असता अपिलार्थीने प्रस्तुत ६९ प्रकरणात मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची तसेच दिर्घ कालावधीची आहे. तरीही जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अर्ज / अपिल अर्जावर कार्यवाही करुन उपलब्ध सर्व माहिती अपिलार्थीस पुरविली आहे, तरी देखील त्यांचे समाधान होत नाही. यास्तव, अपिलार्थी हे त्यांचा अंतस्त हेतू साध्य करण्यासाठी माहिती अधिकार कायद्याचा हत्यार म्हणून वापर करत आहेत, असे आयोगाचे मत झालेले आहे.

३. अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चा वापर करून मोठ्या संख्येने माहिती अर्ज, प्रथम अपीले आणि द्वितीय अपीले सादर करण्याच्या या कृतीशी कोणते व्यापक जनहित निगडित आहे हे नमूद केले नाही, याबाबत त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीत त्यांना संधी दिली असता ते याबाबत काही सांगू शकले नाहीत. यावरून त्यांच्या या कृतीशी कोणतेही व्यापक सार्वजनिक हित निगडीत नाही आणि ती या अधिनियमाच्या प्रस्तावनेत नमूद केलेल्या तत्त्वाशी विसंगत आहे ही बाब स्पष्ट आहे.

४. अपिलार्थी यांनी त्यांना प्राप्त झालेल्या अधिकाराचा (माहिती अधिकार) माफक पध्दतीने वापर करणे आवश्यक असूनही त्यांनी माहिती अधिकार कायद्याचा जाणीवपूर्वक अनिबंध व अवाजवी दुरुपयोग केला आहे. त्यामुळे संबंधित शासकीय कार्यालयाचा बहुमुल्य वेळ, साधनसामग्री व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या दैनंदिन शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झाला आहे.

५. अशा मोठ्या प्रमाणावर अर्ज करण्याच्या कार्यपद्धती मुळे गरजवंत अर्जदारांवर अन्याय होऊन माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या प्रभावी अंमलबजावणीस गतीरोध निर्माण होत आहे. त्याचा निश्चितपणे कार्यालयीन कामकाजावर विपरीत परिणाम होत आहे.

६. अपिलार्थी यांनी त्यांच्या बहुतांश माहिती अर्जात विविध विकास कामांचे कार्यारंभ आदेश, तपासणी

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

अहवाल इ. व्यापक व विस्तृत स्वरुपाची माहिती मागणी केलेली आहे. तरी देखील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी माहिती अर्ज व अपिलीय अर्जावर कार्यवाही केलेली आहे.

उपरोक्त सर्व बाबी तसेच मा.सर्वोच्च न्यायालय, मा. उच्च न्यायालय व मा. केंद्रीय माहिती आयोगाकडील अशा प्रकरणी वेळोवेळी दिलेले, ऐतिहासिक, क्रांतीकारी व लक्ष्यवेधी निर्णय विचारात घेता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होत आहे व संबंधित शासकीय खात्यांचा / प्राधिकरणांचा बहुमूल्य वेळ वाया जात असल्याचे दिसून येते. ही बाब माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झाले आहे.

सबब, अपीलार्थी यानी दाखल केलेल्या द्वितीय अपिलांमध्ये कोणतेही तथ्य किंवा गुणवत्ता आढळून येत नसल्यामुळे व त्यातून कोणतेही जनहित साध्य होत नसल्यामुळे, त्यांनी दाखल केलेली सर्व द्वितीय अपिले कोणत्याही निर्देशाविना फेटाळण्याच्या निष्कर्षाप्रत येऊन आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश.**

अपिलार्थी यांची सर्व ६९ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(मकरंद रानडे)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे.

जा.क्र.- 7513/2025 दिनांक :- 28/3/2025

| अक्र | अपिल क्रमांक | अपिल वर्ष | जिल्हा | अपिलार्थी | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ७६८ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, जुन्नर पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-२ सामाजिक वनीकरण विभाग पुणे |
| २ | ७६९ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, शिरूर पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-२ सामाजिक वनीकरण विभाग पुणे |
| ३ | ७७० | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र, खेड पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-२ सामाजिक वनीकरण विभाग पुणे |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | १२१९ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ५ | १२२० | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ६ | १२२१ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी ओतूर | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ७ | १२२२ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी शिरूर | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ८ | १२२३ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | कार्यालय अधिकारी जुन्नर | सहाय्यक वनसंरक्षक (व.सं.अ.नि.) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ९ | १२२४ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी घोडेगाव | सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण. कॅम्पा व संवव्य) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| १० | १२२५ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी घोडेगाव | सहाय्यक वनसंरक्षक (वनीकरण. कॅम्पा व संवव्य) उपवनसंरक्षण, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ११ | १२२६ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वरिष्ठ लेखा लिपिक विभागीय कार्यालय | उपकार्यकारी अभियंता सा.बां.विभाग सातारा |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १२ | १२२७ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | शाखा अभियंता विभागीय कार्यालय | उपकार्यकारी अभियंता सा.बां.विभाग सातारा |
| १३ | ४४४१ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम विभाग वडूज, जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती खटाव(वडूज),जि.सातार. |
| १४ | ४४४२ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप विभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग जावली, जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती जावली,जि.सातारा. |
| १५ | ४४४३ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप विभागीय अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग माण (दहिवडी), जि.सातारा. | गट विकास अधिकारी पंचायत समिती माण (दहिवडी), जि.सातारा. |
| १६ | ४४४४ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकामं,उपविभाग पाटण,जि.सातारा. | गट विकास अधिकारी सार्वजनिक बांधकामं,उपविभाग पाटण,जि.सातारा. |
| १७ | ४४४५ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप अभियंता उप अभियंता बांधकाम उपविभाग खंडाळा, जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती खंडाळा, ता.खंडाळा,जि.सातार. |
| १८ | ४४४६ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप अभियंता जि.प.बांधकाम उप विभाग फलटण जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती फलटण,जि.सातारा. |
| १९ | ४४४७ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप अभियंता जि.प.बांधकाम उप विभाग सातारा जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती सातारा,जि.सातारा. |
| २० | ४४४८ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उप अभियंता जि.प.बांधकाम उप विभाग वाई ,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती वाई,जि.सातारा. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ | ४४४९ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती कोरेगाव,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती कोरेगाव,जि.सातारा. |
| २२ | ४४५० | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती पाटण,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती पाटण,जि.सातारा. |
| २३ | ४४५१ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती वाई,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती वाई,जि.सातारा. |
| २४ | ४४५२ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | वरिष्ट सहा. पंचायत समिती माण (दहिवडी),जि.सातारा. | गट विकास अधिकारी पंचायत समिती माण (दहिवडी),जि.सातारा. |
| २५ | ४४५३ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती फलटण,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती फलटण,जि.सातारा. |
| २६ | ४४५४ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती खटाव(वडूज),जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती खटाव(वडूज),जि.सातारा. |
| २७ | ४४५५ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | उप कार्यकारी अभियंता कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता.जुन्नर,जि.पुणे. | कार्यकारी अभियंता कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता.जुन्नर,जि.पुणे. |
| २८ | ४४५६ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती जावली (मेढा) जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती जावली (मेढा) जि.सातारा. |
| २९ | ४४५७ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | उप कार्यकारी अभियंता कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता.जुन्नर,जि.पुणे. | कार्यकारी अभियंता कुकडी पाटबंधारे विभाग क्र.१, नारायणगाव, ता.जुन्नर,जि.पुणे. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ४४५८ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती कराड,जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती कराड,जि.सातारा. |
| ३१ | ४४५९ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक प्रशासन अधिकारी पंचायत समिती खंडाळा, जि.सातारा. | गट विकास अधिकारी वर्ग-१ पंचायत समिती खंडाळा, जि.सातारा. |
| ३२ | ४६०९ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | उपविभागीय अभियंता मुठा कालवे पंथाबंधारे उपविभाग, स्वारगेट, पुणे. | कार्यकारी अभियंता खडकवसला पाठबंधारे विभाग पुणे. |
| ३३ | ४६१० | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | शाखा अभियंता सार्वजनिक बांधकामं,विभाग,सातारा. | उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकामं,विभाग,सातारा. |
| ३४ | ४६११ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | निविदा लिपिक / विभागीय भांडारपाल सार्वजनिक बांधकामं,विभाग,सातारा. | उप कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकामं,विभाग,सातारा. |
| ३५ | ४६१२ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | शाखा अभियंता सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (दाक्षिण) पाटण,जि.सातारा. | उप अभियंता सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (दाक्षिण) पाटण,जि.सातारा. |
| ३६ | ४६१३ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | सहाय्यक अभियंता श्रेणी-२ सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (उत्तर) कराड,जि.सातारा. | उप विभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (उत्तर) कराड,जि.सातारा. |
| ३७ | ४६१४ | २०२४ | सातारा | सलीम कादर शेख | शाखा अभियंता सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (दाक्षिण) पाटण,जि.सातारा. | उप विभागीय अभियंता सार्वजनिक बांधकामं,उपविभाग (दाक्षिण) पाटण,जि.सातारा. |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३८ | ४६३२ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी इंदापूर | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड पुणे. |
| ३९ | ४६३३ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी दौंड | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड पुणे. |
| ४० | ४६३४ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वडगाव | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड पुणे. |
| ४१ | ४९१४ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | जन माहिती अधिकारी, वन विभाग, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी, वन विभाग, पुणे |
| ४२ | ४९१५ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | जन माहिती अधिकारी, वन विभाग, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी, वन विभाग, पुणे |
| ४३ | ४९१६ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | जन माहिती अधिकारी, वन विभाग, पुणे | प्रथम अपिलीय अधिकारी, वन विभाग, पुणे |
| ४४ | ३९९७ | २०२३ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी औतुर | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ४५ | ३९९८ | २०२३ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी शिरूर | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ४६ | १२९१ | २०२४ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी जुन्नर | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |
| ४७ | ३९९६ | २०२३ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी औतुर | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, घोडप्रकल्प वन विभाग, जुन्नर |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४८ | ७६ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय भांबुर्डा, पुणे | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक, पुणे वन विभाग, सेनापती बापट रोड पुणे. |
| ४९ | ७७ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय इंदापूर,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक कार्यालय, पुणे वन विभाग, पुणे. |
| ५० | ७८ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय पुणे वानवडी,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक (व.व.सं.) उपवनसंरक्षक कार्यालय, पुणे वन विभाग, पुणे. |
| ५१ | १०८ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र भोर,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ५२ | १०९ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र सासवड,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ५३ | ११० | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र इंदापूर,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ५४ | १११ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र शिरूर,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ५५ | ११२ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र बारामती,जि.पुणे | सहाय्यक वनसंरक्षक-१, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ५६ | १६६ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | शाखा अभियंता बांधकाम विभाग दक्षिण,सातारा जिल्हा परिषद,सातारा | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग दक्षिण, सातारा जिल्हा परिषद, सातारा |
| ५७ | १६७ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | शाखा अभियंता बांधकाम विभाग दक्षिण,सातारा जिल्हा परिषद,सातारा | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग दक्षिण, सातारा जिल्हा परिषद, सातारा |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५८ | १६८ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय दौंड, जि. पुणे | सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय, पुणे वन विभाग, पुणे |
| ५९ | १६९ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय बारामती, जि. पुणे | सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय (सांख्यिकी), पुणे वन विभाग, पुणे |
| ६० | १७० | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | शाखा अभियंता बांधकाम विभाग दक्षिण,सातारा जिल्हा परिषद,सातारा | कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग दक्षिण, सातारा जिल्हा परिषद |
| ६१ | १७१ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनपरिक्षेत्र अधिकारी वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरोता,मु.वडगाव मावळ, जि. पुणे | सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय (सांख्यिकी), पुणे वन विभाग, पुणे |
| ६२ | ६३५ | २०२५ | सोलापूर | सलीम कादर शेख | वन परिक्षेत्र अधिकारी नान्नज,(वन्यजीव)ता. करमळा,जि. सोलापूर.४१३२०३ | सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय (सांख्यिकी), पुणे वन विभाग, पुणे |
| ६३ | ६३६ | २०२५ | सोलापूर | सलीम कादर शेख | वन परिक्षेत्र अधिकारी नान्नज,(वन्यजीव)ता. करमळा,जि. सोलापूर.४१३२०३ | सहाय्यक वनसंरक्षक, उपवनसंरक्षक कार्यालय (वन्यजीव), पुणे वन विभाग, पुणे |
| ६४ | ६३७ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,आंबेगाव,जुन्नर ,पुणे,खेड,वडगाव मावळ. | सहाय्यक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ६५ | ६३८ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,आंबेगाव,जुन्नर ,पुणे,खेड,वडगाव मावळ. | सहाय्यक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६६ | ६३९ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,आंबेगाव,जुन्नर ,पुणे,खेड,वडगाव मावळ. | सहाय्यक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ६७ | ६४० | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,आंबेगाव,जुन्नर ,पुणे,खेड,वडगाव मावळ. | सहाय्यक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ६८ | ६४१ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वनक्षेत्रपाल सामाजिक वनीकरण परिक्षेत्र,आंबेगाव,जुन्नर ,पुणे,खेड,वडगाव मावळ. | सहाय्यक वनसंरक्षक-२, सामाजिक वनीकरण विभाग, पुणे |
| ६९ | ६४२ | २०२५ | पुणे | सलीम कादर शेख | वन परिक्षेत्र अधिकारी वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय सुपे (वन्यजीव) ता.बारामती जि. पुणे. | सहाय्यक वनसंरक्षक उपवनसंरक्षक (वन्यजीव), अहमदनगर स्थित, पुणे |

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
पुणे खंडपीठ